# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/04/2023 (शुक्रवार) सकाळ

### जबरी चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील घोडे प्लॉट साई मंदीर जवळ काटोल येथे दिनांक २०/०४/२०२३ चे १०/४५ वा. ते ११/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिपक महादेवराव भोरकर वय ६५ वर्षे रा घोडे प्लॉट, साई मंदीरजवळ काटोल हे प्लास्टीकच्या कटोऱ्यामध्ये पाणी फेकण्याकरीता घराचे बाहेर आले व पाणी फेकुन घरात परत जातांना मोटर सायकल वरील दोन २० ते ३० वयोगटातील अनोळखी व्यक्तीने फिर्यादीचे जवळ येवुन मोटर सायकलवर चालकाचे मागे बसलेल्या व्यक्तीने फिर्यादीचे छातीवर जोराने थाप मारून फिर्यादीचे गळयातील २ तोळे वजनाची सोन्याची चैन किंमती अंदाजे १,१५,०००/— रू. ची जबरीने हिसकावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. दत्तायत्र कोलटे पोस्टे काटोल मो. क्र. ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १३ किमी अंतरावर झुल्लर फाटा मौदा येथे दिनांक २०/४/२०२३ चे ००/२० वा. ते ०१/३० वा. दरम्यान विना नंबरचा स्वालीस कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर व हिरव्या रंगाची विना नंबरची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— १) स्वप्नील वसंताजी साहारे, वय २६ वर्ष, रा. आंबाडी केसोरी कामठी व मालक नामे—२) सौरभ उर्फ लक्की गजानन भिवगडे वय २५ वर्ष, रा. झुल्लर** यांनी विनापरवाना अवैधरीत्या ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती गौनखनिज चोरी करून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने चालकाचा ताब्यातुन १ ब्रास रेती किंमती अंदाजे ४०००/—रू. विना नंबरचा स्वालीस कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर किंमती अंदाजे ७,००,०००/—रु. व हिरव्या रंगाची विना नंबरची ट्रॉली किंमती १,००,०००/—रु. असा एकुण वाहनासह किंमती अंदाजे ८,०४,०००/रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक ब. नं. ८४७ दिपक दरोडे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. सोनेकर मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर